# नियमित दिवाणी दावा क्र.४९८/२०२३ मधील निशाणी क्र.२४ खाली आदेश

## (पारित दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दाखल केला असुन त्यांचेविरूध्द पारित झालेला No W.S. चा हुकूम सेट – असाईड करुन कैफीयत व जबाब दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. सदर प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे म्हणणेनुसार सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटप, जाहीर ठराव, निरंतर मनाई व ताब्याकरीता दाखल केला असुन त्यांनी वादीचे दाव्यास कैफीयत व जबाब न दिल्यामुळे दि.२५/०६/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेविरुध्द No W.S. चा आदेश पारीत करण्यात आला.

२. सदर प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असुन न्यायालयाचे समन्स मिळाल्यानंतर ते प्रकरणात हजर झाले परंतु प्रतिवादी हे वयस्कर असुन त्यांना त्यांच्या कामाच्या व्यापामुळे वकीलांना तारखेवेळी भेटता आले नाही. तसेच त्यांना आवश्यक ती कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत, त्यांना कायद्याच्या पध्दतीची माहिती नसल्यामुळे त्यांचे वकीलांना कैफीयत व जबाब देणेकामी कागदपत्रे व माहिती देवु शकले नाहीत. सदर प्रतिवादी क्र.१ व २ यांना वस्तुस्थीतीदर्शक कैफीयत व जबाब मुदतीत देता आले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द No W.S. चा आदेश पारीत करण्यात आल्याचे नमुद केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदरचा दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असुन दावा गुणदोषावर सुनावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायालयासमोर वस्तुस्थीती येईल व न्यायनिर्णय सुकर होईल, वादाचे अंतिम निराकरण होईल. सदर प्रतिवादी क्र.२ व ३ यांना कैफीयत व जबाबदाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांना कैफीयत व जबाबदावा दाखल करुन घेण्याची परवानगी मागितली. त्यांचेविरुध्द पारीत झालेला No Say, No W.S चा आदेश सेट असाईड करुन कैफीयत व जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणेस विनंती केली.

३. सदर अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे दाखल केले. वादीचे म्हणणेनुसार सदर प्रतिवादींना दि.२८/०२/२०२४ रोजी न्यायालयाचे समन्सची बजावणी झाली असुन त्यांना ११ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. त्यांना म्हणणे देण्यास विलंब का झाला यासाठी प्रतिवादींनी दिलेले कारण संयुक्तीक नसुन त्यांना कागदपत्रे मिळण्यास उशीर झाल्याचे नमुद केले परंतु, याबाबत कोणतेही पुरावाजन्य कागदपत्रे दाखल केले नाही. त्यामुळे नमुद कारण विचारात घेणे योग्य व कायदेशिर नाही. तसेच वादीला न्याय मिळणेस विलंब होत आहे. तसेच सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी दिला असुन सदरचा अर्ज विनंतीप्रमाणे मंजुर करता येणे कायदेशिर होणार नसल्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यास पात्र असल्याचे नमुद केले. तसेच प्रतिवादींना संधी दिल्यास जास्ती जास्त दंड आकरण्याची विनंती केली.

४. दोन्ही विधिज्ञांचे म्हणणे ऐकले. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरून असे दिसुन येते की, दि.२५/०६/२०२४ रोजी सदर प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेविरुध्द विनालेखी म्हणणे व विनालेखी जबाबाचा आदेश पारीत झाला. त्यानंतर दि.१६/०१/२०२५ रोजी सदर प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा दावा हा अचल संपत्तीच्या अनुशंगाने जाहीर ठराव, वाटप व कायम मनाई हुकूम मिळणेकामी असल्याने प्रतिवादींना संधी देणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादींनी दिलेली अर्जातील कारणे संयुक्तीक आहेत. त्याकरीता प्रतिवादींचे म्हणणे अभिलेखावर येणे गरचेजे आहे. उपरोक्त चर्चेवरुन माझ्या मते नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादींचा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत वाटते. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी जबाबदावा दाखल न केल्याने प्रकरण प्रलंबित आहे. त्यामुळे सदर वादीचे नुकसान झाले असल्याने सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो –

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचा निशाणी २४ वरील अर्ज रु.१,०००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. दि.२५/०६/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेविरुध्द पारीत झालेला विनालेखी म्हणणे व विनालेखी जबाबाचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. संबंधीत लिपीकांनी आदेशाच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.२ व ३ यांचा जबाबदावा प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादीस रु.१,०००/– खर्च अदा केल्यानंतर अभिलेखावर घ्यावा.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.02.25 17:26:31 +0530

दौंड, (एस.एन. पाटील)
दि.२५/०२/२०२५ ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
दौंड, जि. पुणे

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | एम.एम. चिंतले, |
| न्यायालयाचे नांव | :: | एस.एन. पाटील,<br>३ रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड<br>ता.दौंड, जि.पुणे |
| निकाल दिनांक | :: | २५/०२/२०२५ |
| पिठासीन अधिका–याने सही केलेचा दिनांक | :: | २५/०२/२०२५ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | :: | २७/०२ /२०२५ |